Mahatma Phule Shikshan Sanstha’s
KARMAVEER BHAURAO PATIL COLLEGE,
URUN-ISLAMPUR

**Department of NSS**

(2025-26)

Date: 15.10.2025

# Notice

कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज मधील सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, बुधवार दि. 15 ऑक्टोंबर 2025 रोजी भारतरत्न डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती ‘वाचन प्रेरणा दिन’ म्हणून साजरा करण्यात आहे त्या निमित्ताने भारतीय संविधान उद्देशिका, मुलभूत अधिकार व कर्तव्य यांचे वाचन करण्यात येणार आहे तरी सर्वांनी उपस्थित राहावे.

Co-ordinator

Head of Department

Mahatma Phule Shikshan Sanstha's
KARMAVEER BHAURAO PATIL COLLEGE,
URUN-ISLAMPUR
**Department of NSS**
(2025-26)

Date: 15.10.2025

**Title of the Activity/Event: 'वाचन प्रेरणा दिन'**

**Resource Person: प्रा.अभयकुमार पाटील,**
**प्राचार्या डॉ. अर्चना थोरात**
**प्रा. सुजाता चोपडे**
**प्रा.डॉ. बळीराम सावंत**

**Name of President:**
**प्राचार्य डॉ. नितीन शिंदे**

**Name of Co-ordinator:**
**प्रा.डॉ. प्रकाश आठवले**

**Number of Participants:**
**103**

Mahatma Phule Shikshan Sanstha's
KARMAVEER BHAURAO PATIL COLLEGE,
URUN-ISLAMPUR

**Department of NSS**

(2025-26)

**Date:**

**Title of the Activity/Event:**

**Program Schedule**

| **Event** | **Person** |
|---|---|
| Welcome & Introduction | **प्रा.अभयकुमार पाटील,** |
| Introduction of Guest | **प्रा.अभयकुमार पाटील,** |
| Felicitation of Guest | **प्राचार्य डॉ. नितीन शिंदे** |
| Chief Guest Address | **प्राचार्या डॉ. अर्चना थोरात**<br>**प्रा. सुजाता चोपडे**<br>**प्रा.डॉ. बळीराम सावंत** |
| Presidential Address | **प्राचार्य डॉ. नितीन शिंदे** |
| Vote of Thanks | **प्रा.एकनाथ पाटील** |
| Anchoring | **प्रा.अश्विनी थोरात** |

Mahatma Phule Shikshan Sanstha's
KARMAVEER BHAURAO PATIL COLLEGE,
URUN-ISLAMPUR

**Department of NSS**

(2025-26)

**Date:-**

## Report

वाचन प्रेरणा दिनानिमित्त संविधान वाचन कार्यक्रम संपन्न"

इस्लामपूर (प्रतिनिधी):

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण–इस्लामपूर आणि प्रा. डॉ. एन. डी. पाटील विधी महाविद्यालय, उरुण–इस्लामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे मध्यवर्ती ग्रंथालय, राष्ट्रीय सेवा योजना (**NSS**), एन.सी.सी., मराठी विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (**IQAC**) यांच्या सहकार्याने "भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंती – वाचन प्रेरणा दिन २०२५" निमित्त संविधान वाचन कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस ग्रंथपाल प्रा. अभयकुमार पाटील यांनी प्रभावी प्रस्थावना सादर करत कार्यक्रमाचे उद्दिष्ट स्पष्ट केले. त्यांनी "वाचन प्रेरणा दिन" साजरा करण्यामागील डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे प्रेरणादायी विचार, तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजविण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

यानंतर प्राचार्य डॉ. अर्चना थोरात यांनी संविधानाचे महत्त्व सांगताना भारतीय लोकशाहीची पायाभूत तत्त्वे आणि उद्देशिकेतील मूल्यांची सखोल व्याख्या केली. त्यांनी संविधान हे भारतीय नागरिकांचे जीवनदर्शन असून त्याचे नियमित वाचन ही नागरिक म्हणून आपली जबाबदारी असल्याचे प्रतिपादन केले. त्यानंतर त्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन सर्वांसमोर केले.

प्रा. सुजाता चोपडे यांनी संविधानातील मूलभूत अधिकारांचे वाचन करताना प्रत्येक नागरिकाच्या स्वातंत्र्य, समानता आणि न्याय या मूल्यांचे महत्त्व स्पष्ट केले. तर डॉ. बळीराम सावंत यांनी मूलभूत कर्तव्यांवर भाष्य करत संविधानात नमूद असलेल्या जबाबदाऱ्या नागरिकांनी प्रामाणिकपणे पार पाडाव्यात, असे सांगितले आणि त्या कर्तव्यांचे वाचन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात संविधानाचे आजच्या युगातील संदर्भ आणि त्याची सामाजिक उपयुक्तता यावर सविस्तर विवेचन केले. त्यांनी सांगितले की, तरुण पिढीने संविधानाच्या मूल्यांना आपल्या वर्तनात उतरवून समाजात सकारात्मक बदल घडवावा, हीच खरी राष्ट्रसेवा आहे. तसेच पुढील काळातही असे उपक्रम सातत्याने राबविण्याचे आवाहन त्यांनी संस्थेला व विद्यार्थ्यांना केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अश्विनी थोरात यांनी ओघवत्या शैलीत केले, तर आभारप्रदर्शन प्रा. एकनाथ पाटील यांनी मानले. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. प्रकाश आठवले यांनी अत्यंत प्रभावीपणे केले.

या कार्यक्रमास दोन्ही महाविद्यालयांचे प्राध्यापक, कर्मचारीवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Co-ordinator                                        Head of Department

Mahatma Phule Shikshan Sanstha’s
KARMAVEER BHAURAO PATIL COLLEGE,
URUN-ISLAMPUR

# Department of NSS

(2025-26)

**Date:**

## Photo Gallery




वाचन प्रेरणादिना निमित्त कार्य्क्रम्त सहभागी




वाचन प्रेरणादिना निमित्त कार्य्क्रम्त सहभागी